आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१४ ऑगस्ट २०२६ - शुक्रवार

**ठळक बातम्या**

- स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज देशवासीयांना संबोधित करणार

- स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध विभागांमधल्या १ हजार ५७ कर्मचाऱ्यांना शौर्य आणि सेवा पदकं जाहीर/ पदकविजेत्यांमध्ये राज्यातल्या ७९ जणांचा समावेश

- यंदाच्या जनगणनेत नागरिकांना ‘जात’ विचारली जाणार, सरकारकडून प्रश्नांची अधिसूचना जारी

- स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी केलेल्या वक्तव्याप्रकरणी राहुल गांधी यांच्याविरोधातला मानहानीचा खटला सर्वोच्च न्यायालयाकडून रद्द

**आणि**

- गडचिरोलीतल्या आश्रमशाळेत सर्पदंशामुळं झालेल्या विद्यार्थिनींच्या मृत्यूप्रकरणी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं मागवला अहवाल

<><><><><>

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज देशवासीयांना संबोधित करणार आहेत. आज संध्याकाळी ७ वाजता आकाशवाणी आणि दूरदर्शनवरुन हिंदी आणि इंग्रजीतून हा संदेश प्रसारित होईल. त्यामुळं आकाशवाणीवरचं संध्याकाळचं प्रादेशिक बातमीपत्र आज पावणे ७ वाजता प्रसारित होणार आहे. राष्ट्रपतींच्या या संदेशाचा प्रादेशिक भाषांमधला अनुवाद रात्री साडेनऊ वाजता आकाशवाणीवरून प्रसारित करण्यात येईल.

<><><><><>

८० व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या सकाळी लाल किल्ल्यावर ध्वजारोहण होणार आहे. त्यानंतर ते देशाला उद्देशून संबोधन करतील. या विषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**व्हाइस कास्ट**

*देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी देशभरात जय्यत तयारी सुरू आहे. देशाचा मुख्य कार्यक्रम लाल किल्ल्यावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत होईल.*

*यावेळी ध्वजारोहणासाठी कॅप्टन सोनिया सिंग चौहान प्रधानमंत्र्यांना सहाय्य करतील. त्यानंतर २१ तोफांची सलामी दिली जाईल. यावर्षी पहिल्यांदाच लाल किल्ल्यावर वंदे मातरम या राष्ट्रीय गीताचं गायन होईल. त्यानंतर राष्ट्रगीत गायलं जाईल. भारतीय सैन्यदलातले जवान, माय भारतचे स्वयंसेवक यासह मुले-मुली मिळून एकूण अडीच हजार जण यावेळी उपस्थित असतील. याशिवाय प्रधानमंत्री विश्वकर्मा योजना, मुद्रा योजना, पीएम स्वनिधी योजनेचे लाभार्थी, भारत टॅक्सीचे चालक असे ५ हजार विशेष पाहुणे यासाठी विशेष निमंत्रित आहेत.*

*संध्याकाळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राष्ट्रपती भवनात स्वागत समारंभाचं आयोजन करणार आहेत. यासाठीच्या निमंत्रण पत्रिकेत वारली चित्रकलेचा समावेश आहे. या समारंभात लावणी नृत्य, सोंगी मुखवटे सादर केले जाणार आहेत. याशिवाय गोंधळ, जागरण, वाघ्या मुरळी परंपरेतले लोक कलाकार यात सहभागी होणार आहेत. या पाहुण्यांसाठी आयोजित मेजवानीच्या टेबलावर खण ठेवला जाणार आहे. तर खाद्य पदार्थांमध्ये वडा पाव, पातोळे यांच्या समावेश आहे.*

**<><><><>**

आज १४ ऑगस्ट. आजचा दिवस संपूर्ण देशात ‘फाळणी वेदना स्मृती दिन’ म्हणून पाळला जातो. आजच्या फाळणी वेदना स्मृती दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी फाळणीच्या काळात जीव गमावलेल्या नागरिकांच्या स्मृतीला आदरांजली वाहत त्यांच्या धैर्याचे स्मरण केलं. हा दिवस भारताच्या फाळणीच्या त्या शोकांतिकेची आठवण करून देतो. घर, कुटुंबीय, संपत्ती गमावल्यानंतरही असंख्य नागरिकांनी पुन्हा आपले जीवन उभे करण्याचा निर्धार दाखवला. त्यांच्या संघर्ष, धैर्य, त्याग आणि जिद्दीचे स्मरण करण्याचा हा दिवस असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

स्वातंत्र्य दिनानिमित्त केंद्रीय गृह मंत्रालयानं पोलीस दल, अग्निशमन सेवा, होम गार्ड्स, नागरी संरक्षण आणि सुधार सेवा विभागातल्या एकूण ‘एक हजार ५७ कर्मचाऱ्यांना’ शौर्य आणि सेवा पदकं जाहीर केली आहेत. केंद्रीय गृह मंत्रालयानं आज एकूण ३०१ शौर्य पदकांची यादी जाहीर केली यात पोलीस दलातल्या २७२ पोलीस कर्मचारी आणि अग्निशमन सेवा विभागातल्या २९ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. जीव आणि मालमत्तेचं रक्षण करणं, गुन्हे रोखणं

किंवा गुन्हेगारांना पकडणं यासाठी उल्लेखनीय धैर्य दाखवल्याबद्दल शौर्य पदक दिलं जातं. तसंच एकूण ९२ राष्ट्रपती पदकं जाहीर करण्यात आली असून यामध्ये पोलीस सेवेसाठी ८३, अग्निशमन सेवेसाठी ४, नागरी संरक्षण आणि होमगार्ड सेवेसाठी ३ आणि सुधार सेवा विभागासाठी २ पदकांचा समावेश आहे. यासह ‘उत्कृष्ट सेवेसाठी’ एकूण ६६४ जणांना पदकं जाहीर करण्यात आली असून यात पोलीस दलातल्या सेवेसाठी ६०६, अग्निशमन सेवेसाठी २८, नागरी संरक्षण आणि होमगार्ड सेवेतल्या १८ आणि सुधार सेवा विभागातल्या १२ कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

पदकविजेत्यांमध्ये राज्यातल्या ७९ जणांचा समावेश आहे. यापैकी २० जणांना शौर्य पदकं, ३ जणांना उत्कृष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पदकं, ३७ जणांना ‘उत्कृष्ट सेवेसाठी’ पदकं जाहीर झाली आहेत.

<><><><><>

सध्या सुरू असलेल्या जनगणनेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची यादी अधिसूचनेद्वारे देशाचे ‘जनगणना आयुक्त आणि महा रजिस्ट्रार’ यांनी आज राजपत्रात प्रसिद्ध केली आहेत. त्यात नागरिकांना जात नोंदवण्याचा पर्याय उपलब्ध करून दिला आहे. २०११ मध्ये झालेल्या जनगणनेच्या वेळी केवळ अनुसूचित जाती आणि जमातीच्या नागरिकांना जात नोंदवण्याचा पर्याय उपलब्ध होता.

गेल्या वेळेच्या जनगणनेत एकूण २९ प्रश्न नागरिकांना विचारले गेले होते, यावेळी ही संख्या ४० झाली आहे.जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात ही माहिती नागरिकांना विचारली जाईल. यात यंदा कोविड लस घेतल्याचे ठिकाण, एकूण बँक खात्यांची संख्या, मोबाईल, आधार, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट आणि वाहन परवाना याचीही माहिती विचारली आहे.

<><><><><>

स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर आज राज्यात विविध जिल्ह्यांत तिरंगा रॅलीचं आयोजन करण्यात आलं. **भंडारा जिल्ह्यात** हर घर तिरंगा अभियानांतर्गत आज भव्य तिरंगा रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं. या रॅलीमध्ये शहरातील विविध शाळांचे विद्यार्थी आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

**सांगली, मिरज आणि कुपवाड** महानगरपालिकेकडून सांगली शहरात  सायकल आणि ई-बाईक रॅली काढण्यात आली. **रत्नागिरीतही** हर घर तिरंगा’ अभियानांतर्गत आज तिरंगा

पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. या पदयात्रेत पालकमंत्री उदय सामंत यांच्यासह विद्यार्थी, महिला आणि नागरिक सहभागी झाले होते.

**यवतमाळमध्येही** तिरंगा पदयात्रा काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी हातात घेतलेला अडीचशे फूट लांबीचा तिरंगा ध्वज या पदयात्रेचं आकर्षण ठरला.

<><><><><>

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासंदर्भात केलेल्या मानहानीकारक वक्तव्यांप्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधात दाखल झालेला खटला सर्वोच्च न्यायालयानं आज रद्द केला. या प्रकरणात आवश्यक असलेली कायदेशीर मंजुरी घेतली नसल्याचं सांगत न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती शील नागू यांच्या पीठाने हे आदेश दिले. उत्तर प्रदेश सरकारनं दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रातही मंजुरीचा कोणताही उल्लेख नसल्याचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल आणि तक्रारदाराच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनाला आणून दिलं. त्यानंतर न्यायालयाने ही खटला रद्द केल्याचा आदेश दिला. अकोला जिल्ह्यात ‘भारत जोडो यात्रे’दरम्यान झालेल्या एका सभेत राहुल गांधी यांनी सावरकरांबाबत मानहानीकारक वक्तव्य केल्याचं सांगत त्यांच्याविरोधात तक्रार दाखल झाली होती.

<><><><><>

गडचिरोलीमध्ये जपतलाई इथल्या आश्रमशाळेच्या वसतीगृहात सर्पदंशामुळे तीन विद्यार्थिनींच्या मृत्यु प्रकरणाची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगानं स्वतःहून दखल घेतली आहे. या प्रकरणात राज्याच्या मुख्य सचिवांना आयोगानं नोटीस बजावली असून दोन आठवड्यांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्यातील आश्रमशाळांमध्ये गेल्या दोन वर्षांत ५८४ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती आदिवासी विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी आज दिली. हे मृत्यू सर्पदंश, सिकलसेल, गंभीर आजार, अपघात आणि आत्महत्यांमुळे झाल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं. राज्य सरकारतर्फे आदिवासी समाजातील मुलांसाठी ५०० शासकीय आणि ५१३ अनुदानित निवासी आश्रमशाळा चालवल्या जातात. गेल्या दोन वर्षांत शासकीय आश्रमशाळेत ३८४ तर अनुदानित आश्रमशाळांमध्ये २०० विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

//<><><><><>//